# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## Maharashtra Prathamik Shikshan Parishad

(Govt. of Maharashtra Undertaking)


**जा.क्र. मप्राशिप/समग्र शिक्षा अभियान/गणवेश/२०१८-१९/७६०५** **दिनांक :** 1 5 JUN 2018

**प्रति,**

**१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).**

**२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).**

**विषय : समग्र शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मोफत गणवेश उपक्रमाची सन २०१८-१९ मध्ये अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ : १) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक : डिसीटी २३१६/ प्र.क्र.१३३/का.१४१७,दिनांक ०५ डिसेंबर २०१६.**

**२) या कार्यालयाचे पत्र क्र.मप्राशिप/सशिअ/गणवेश/२०१७-१८/२८९२, दि.१४/१२/२०१७.**

**३) दि.१० मे,२०१८ रोजीच्या प्रकल्प मान्यता मंडळ (PAB) च्या बैठकीत मिळालेली तत्त्वत: मंजूरी.**

शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) व शिक्षकांचे शिक्षण (Teacher Education) या केंद्र पुरस्कृत योजनांचे एकत्रिकीकरण करून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून समग्र शिक्षा अभियान ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. दिनांक १० मे, २०१८ रोजी आयोजित प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत राज्याच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास भारत सरकारने तत्त्वत: मंजूरी दिली आहे.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत राज्यातील इ. १ ली ते इ. ८ वीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील सर्व मुली, अनुसूचित जातीचे मुले, अनुसूचित जमातीची मुले, दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले या विद्यार्थ्यांसाठी गणवेश ही योजना लागू आहे.

सदर योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांच्या गणवेशाकरिता रू. ३००/- याप्रमाणे २ गणवेश संचाकरिता रू. ६००/- प्रमाणे तरतूद सन २०१८-१९ मध्ये मंजूर आहे. सदर तरतूद शाळा व्यवस्थापन समितीकडे तात्काळ वर्ग करण्यात यावी. गणवेश योजनेचा निधी वितरणास विलंब होणार नाही व सदर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव घेऊन समितीच्या मान्यतेने पात्र लाभार्थ्यांना खर्चाची प्रतिपूर्ती करावी.

D:\LTK Backup\Liladhar\Gaonkar Sir\Letter.doc




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.

Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

दि. ०५/१२/२०१६ रोजीच्या नियोजन विभागाच्या शासन निर्णयाअन्वये सन २०१७-१८ पासून DBT धोरणानुसार मोफत गणवेश या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

१) DBT धोरणानुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करणेबाबतची तरतूद आहे. सदर धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २ DBT नुसार मोफत गणवेश पात्र लाभार्थ्यांच्या पालकांनी स्वत: आपल्या पाल्यास दोन गणवेश संच खरेदीकरून, खरेदी केलेल्या पावत्या (देयक) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करणे बंधनकारक राहील.

३) पालकांनी अगोदर गणवेश खरेदी करून खरेदीचे देयक शाळेच्या मुख्याध्यापकाकडे सादर केल्यानंतरच लाभाची मंजूर रक्कम प्रत्यक्ष बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. म्हणजेच वस्तू, लाभार्थ्याने खरेदी केल्याची खात्री केल्यानंतरच लाभाची रक्कम बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. रक्कम वर्ग करण्याबाबतची कार्यवाही शाळा स्तरावरून करण्यात यावी.

४) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून गणवेश खरेदी देयक प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये निकषानुसार प्रती लाभार्थी दोन गणवेश संचाकरिता मंजूर असलेली रक्कम रू. ६००/- वर्ग करावी.

५) या कार्यालयाच्या दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्ष लाभार्थी विद्यार्थी व त्यांची आई यांच्या संयुक्त बँक खात्याचा आग्रह न धरता, लाभार्थी विद्यार्थी किंवा आई किंवा वडील आणि आई वडील नसल्यास अन्य पालकांचा वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्यावर लाभाची रक्कम वर्ग करता येईल.

६) पात्र लाभार्थीची आई हयात नसल्यास त्याचे इतर पालक / अभिभावक यांचे नावे संयुक्त बँक खाते उघडण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

७) भारत सरकारच्या निर्देशानुसार गणवेश योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक असणे अनिवार्य आहे याबाबत पालकांना अवगत करण्यात यावे.

८) शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये इयत्ता १ ली च्या वर्गात नव्याने दाखल होणाऱ्या गणवेश पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचा निधी तसेच शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या निकष पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचा निधी रोख

स्वरूपात स्वत: पाल्य व त्यांचे आई / वडील, आई-वडील हयात नसल्यास त्यांचे अन्य पालक यांचे नावे उघडण्यात आलेल्या संयुक्त बँक बचत खात्यात रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

९) शालेय गणवेशाचा रंग, प्रकार, इ. बाबी संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरूनच ठरविण्यात याव्यात. गणवेश योजनेच्या अंमलबजावणीचे संपूर्ण अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला असल्याने केंद्र / तालुका / जिल्हा स्तरावरून याबाबत कोणतेही निर्णय घेऊ नये.

सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये जिल्हा व महानगरपालिकानिहाय मंजूर भौतिक लक्ष्य जोडले आहे.

या संदर्भात विविध नाविन्यपूर्ण व आव्हानात्मक कामांचे Videos, Photographs, Case studies, Testimonials, Documents भारत सरकारच्या शगुन पोर्टलवर अपलोड करावयाचे आहे. त्याअनुषंगाने या उपक्रमाशी निगडीत एखादी वैशिष्ट्यपूर्ण बाब Videos, Photographs, Case studies, Testimonials, Documents याआधारे तयार करून या कार्यालयास सादर करावी, याची पडताळणी करून शगुन पोर्टलवर अपलोड करण्यात येईल. उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार सदर उपक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास प्रत्येक मूल शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहील. त्यामुळे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे पालन होऊ शकेल.

**सोबत : परिशिष्ट-अ**

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर :-**

१) मा. मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
४) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद(सर्व).
५) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद (सर्व).
६) शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी/ शिक्षण प्रमुख, महानगरपालिका (सर्व).